महत्त्वाचे

एमआयटीत ऊर्जा व पर्यावरण जागृती कार्यशाळेचे आयोजन

औरंगाबाद : एमआयटी संस्थेत 'ऊर्जा आणि पर्यावरण' या विषयावर मंगळवारी (दि.१४) एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. दिवसेंदिवस ऊर्जा निर्मितीची आवश्यकता वाढत असून, दुसरीकडे पर्यावरण बिघडत चालले आहे. यासाठी नवोदित अभियंत्यांना नवीन उत्पादने निर्मिती आणि सेवा प्रदान करण्यासाठी काही विषयांची माहिती होणे आवश्यक आहे; या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेत डॉ. जगदीश गोडीहाळ, प्रा. कविता गोडीहाळ हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यात सहभागी होण्याचे आवाहन संयोजकांनी केले.

सीबी डॅनियल जोसेफ यांना पीएच.डी.

औरंगाबाद : एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स अभिमत विद्यापीठाने फिजिओथेरपी विषयात सीबी डॅनियल जोसेफ यांना पीएच.डी. प्रदान केली. डॉ. भारती बेललारे आणि डॉ. कविता राजा यांच्या मार्गदर्शनाखाली 'रिझनिंग थेरिप्युटिक अप्रोच फॉर क्रोनिक नेक पेन : अ प्रॅगम्याटिक स्टडी' या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला.

मंजुरी : २७ अत्याधुनिक सामग्रींची होणार खरेदी

कॅन्सर हॉस्पिटलसाठी ३० कोटींची यंत्रे

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : शहरातील शासकीय कर्करोग रुग्णालय म्हणजेच राज्य कर्करोग संस्थेसाठी २९.९० कोटी रुपयांची यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी शुक्रवारी प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली. या निधीतून २७ प्रकारची अत्याधुनिक यंत्रसामग्रींची खरेदी होईल. यामुळे हे रुग्णालय आगामी काही महिन्यांत अत्याधुनिक उपचार आणि पायाभूत सुविधांनी सुसज्ज होणार आहे. त्याचा राज्यभरातील गोरगरीब रुग्णांना मोठा आधार मिळेल.

कर्करोग रुग्णालयाला राज्य कर्करोग संस्थेचा दर्जा मिळण्याच्या दृष्टीने २०१६ मध्ये केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला. त्यादृष्टीने २९ जुलै २०१६ रोजी केंद्राच्या तीन सदस्यीय पथकाने रुग्णालयाची पाहणी केली होती. राज्य कर्करोग संस्थेसाठी १२० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये केंद्र सरकारचा ६० टक्के निधी राहणार आहे, तर राज्य शासनाचा ४० टक्के आहे. याअंतर्गत केंद्र सरकारचा ४३ कोटी रुपये अनुदानाचा पहिला हप्ता मिळाला. रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या यंत्रसामग्रींचा प्रस्ताव देण्यात आला होता. यामध्ये पहिल्या टप्प्यात २९.९० कोटी रुपयांची यंत्रसामग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मंजुरी मिळाली. आगामी काही महिन्यांत खरेदी प्रक्रिया होऊन ही यंत्रसामग्री रुग्णसेवेत दाखल होईल. या यंत्रसामग्रींमुळे रुग्णालय अधिक अद्ययावत होईल, असे कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड म्हणाले.

या यंत्रांची होईल खरेदी

- कार्डिओव्हॅस्कूलर, अल्ट्रासाऊंड सिस्टिम, लॅपरोस्कोपी सेट, हारमोनिक स्कालपेल सेट, सीओटू लेझर, मायक्रोलारिंगोस्कोप, ॲडव्हान्स लॅपरोस्कोपी सेट, गॅस्ट्रोस्कोपी ॲण्ड कॉलोनोस्कोपी व्हिडिओ स्कोप, थॉम्सन रिट्राक्टर सिस्टिम, ऑप्टिकल लूप फूल सेट, ओटेबल.टी., ओटी लॅम्प, इलेक्ट्रोसर्जिकल कॉटरी युनिट व्हेसल सिलिंग, एसॉरटेड सर्जिकल इन्स्ट्रुमेंट विथ गोल्डन हॅण्डल सेट, सेंट्रल स्टेशन फॉर आयसीयू, अनेस्थेशिया वर्क स्टेशन, डिफिब्रिलेटर, प्लेक्झिबल इंट्युबेशन व्हिडिओ एंडोस्कोप ॲडल्ट ॲण्ड पेडियाट्रिक, मॅनिकीन फॉर डेमोनस्ट्रेशन, ब्लड प्लुईड वॉर्मर, ऑप्थाल्मिक मायक्रोस्कोप, ए स्कॅन, ऑटोरिफरेक्टोमीटर विथ केरोमीटर, ऑप्थाल्मिक चेअर युनिट विथ रिमोट ड्रम ॲण्ड सर्जन स्टूल, ओटोबल.टी., रेडिओफ्रिक्वेन्सी कॉटरी, हॅण्ड हेल्ड टोनोमिटरु, लिनर एक्सेलिटर विथ एफएफएफ गेटिंग टेक्नोलॉजी (बंकरसह).

रुग्णसेवेत वाढ

प्रशासनातर्फे प्रस्ताव देण्यात आले आहेत. यंत्रसामग्री खरेदी करण्यास मंजुरी मिळाली आहे. या यंत्रसामग्रीमुळे रुग्णसेवेत वाढ होईल, असे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (घाटी) अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर म्हणाल्या.

हैं तय्यार हम...

मी धावणार माझ्यासाठी

'लोकमत'ने मागील वर्षीपासून सुरु केलेला हा उपक्रम खूपच स्तुत्य आहे. या उपक्रमात सातत्य आहे, ही औरंगाबाद शहरासाठी फार आनंदाची बाब असून, या स्पर्धेत आपण स्वत: धावणार आहोत. धक्काधक्कीच्या आणि धावपळीच्या या युगात आरोग्यासाठी धावणे खूप महत्त्वाचे आहे. मॅरेथॉन स्पर्धेत तर सर्वांनीच आरोग्यासाठी सहभागी व्हायला हवे. नियमित व्यायाम आणि सकाळी चालण्याची सवय लावावी. -नंदकुमार घोडेले, महापौर

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

स्पोर्ट्स् फाऊंडेशन रनर्स ग्रुप (पुरुष)... १७ डिसेंबर रोजी औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये धावण्यासाठी सज्ज असलेले स्पोर्ट्स् फाऊंडेशन रनर्स ग्रुपचे सदस्य - (डावीकडून) मंगेश पुरी, काशीनाथ भारती, तानाजी जोबूतकर, गजानन इंगळे, अरुण पवार, रोहित द्विवेदी, शुभम आहेर, अक्षय सोनवणे, नामदेव राठोड, राज कनकुटे, अविनाश मुंडे, विनय झिने, भरत रेड्डी, प्रवीण खोडे, निखिल जाधव, शांतीपाल साळवे, दिनेश रमंडवाल, संतोष भालेराव, अक्षय गाडेकर, सागर कुऱ्हाडे, सय्यद साहिर, सचिन राठोड, अभिजित पवार व योगेश पुरी.

स्पोर्ट्स् फाऊंडेशन रनर्स ग्रुप (महिला)... महामॅरेथॉनमध्ये धावण्यासाठी सज्ज असलेले स्पोर्ट्स् फाऊंडेशन रनर्स ग्रुपचे सदस्य - (डावीकडून) वनिता गायकवाड, लता सोनवणे, उमा यादव, संध्या लाहुरे, शीतल सुपेकर, प्रियांका एरफुले, ऐश्वर्या शिंदे, आस्मा शेख, सुवर्णा कल्याण, रेखा झाडे, शीतल थोरात, हिना शहा आणि मोहिनी लांबे.

विद्यापीठाच्या अधिसभा पदवीधर गटात 'अभाविप'प्रणीत विद्यापीठ विकास मंचतर्फे शेवटच्या दिवशी नामांकन दाखल केले. यावेळी बीड भाजपचे जिल्हाध्यक्ष रमेश पोकळे, निमंत्रक डॉ. गजानन सानप यांच्यासह उमेदवार उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात भारतीय विद्यार्थी सेनेतर्फे नामांकन दाखल केले. यावेळी भाविसेचे निमंत्रक राजेंद्र जंजाळ, तुकाराम सराफ आदी उपस्थित होते.

विद्यापीठ विकास मंचतर्फे नामांकन दाखल

अधिसभा पदवीधर निवडणूक : शेवटच्या दिवशी गर्दी; एकूण १४२ जणांची उमेदवारी

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अधिसभेच्या पदवीधर गटात नामांकन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी 'अभाविप' पुरस्कृत विद्यापीठ विकास मंचतर्फे सर्व जागांवर नामांकन दाखल करण्यात आले. यावेळी मंचचे निमंत्रक डॉ. गजानन सानप, रमेश पोकळे आदी उपस्थित होते. शेवटच्या दिवशी नामांकन दाखल करण्यासाठी भाविसे, एमआयएम, भारतीय जनता युवा मोर्चासह विविध संघटनांच्या उमेदवारांनी भाऊगर्दी केली होती.

विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत पदवीधर गटात नामांकन दाखल करण्याचा शनिवार हा शेवटचा दिवस होता. या दिवशी विद्यापीठ विकास मंचतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन नामांकन दाखल केले. यात मनोज शेवाळे, योगिता तौर, ॲड. सुनील जाधव, पंकज भारसाखळे, चंद्रकांत फड, अरुण पाठक, ॲड. श्रीकांत कवडे, राजू सूर्यवंशी, शेख करीम जहागीर, राजू काळे, प्रवीण पवार, अमर कदम, विक्रम साळुंखे, काकासाहेब शिंदे, देवीदास पाठक, विलास तागडे, चत्रभुज गोडबोले आणि बाबासाहेब भालेराव यांचा समावेश आहे. नामांकन दाखल करताना डॉ. गजानन सानप, रमेश पोकळे, कल्याणराव आखाडे, निखिल आठवले, विवेक पवार, गोविंद देशपांडे, शिवा कदम, रत्नाकर कुलकर्णी, सविताताई कुलकर्णी, व्यंकटेश कमळू, प्रा. सोमीनाथ खाडे, राम बुधवंत यांच्यासह विद्यापीठ विकास मंचचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'भाजयुमो'चा स्वतंत्र उमेदवार

अधिसभा पदवीधर गटात भाजपशी संबंधित 'अभाविप'ने स्वतंत्र पॅनल टाकलेला असतानाच भारतीय जनता युवा मोर्चाने सुद्धा मयूर वंजारी यांना उमेदवारी देत नामांकन दाखल केले. यावेळी औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद जिल्ह्यांतील कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. यात युवा क्रांतीचे अध्यक्ष नीलेश शिंदे, नारायण आल्हाड, नंदलाल गवळी,भाऊसाहेब गारुळे, मयूर विधाते,अविनाश पवार, अजय शिंदे,अभिजित पारधे आदी उपस्थित होते.

उल्हास उढाण यांची बंडखोरी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी संबंधित असलेले डॉ. उल्हास उढाण यांना राष्ट्रवादी काँग्रेस प्रणीत उत्कर्ष पॅनलतर्फे उमेदवारी नाकारण्यात आल्यामुळे बंडखोरी करत नामांकन दाखल केले. याचवेळी उल्हास उढाण हे स्वतंत्र पॅनलच तयार करण्याच्या तयारीत असल्याचे समजते.

विद्यापीठ विकास मंच व एमआयएमची घोषणाबाजी

नामांकन दाखल करण्यासाठी जात असलेले विद्यापीठ विकास मंचचे पदाधिकारी आणि नामांकन दाखल करुन परतत असलेले एमआयएमचे पदाधिकारी समोरासमोर येताच दोन्ही गटांनी जोरदार घोषणाबाजी केली.

युवासेना-भाविसेचे नामांकन दाखल

विद्यापीठाच्या अधिसभा पदवीधर गटात युवासेना व भारतीय विद्यार्थी सेना या शिवसेनेशी संबंधित संघटनांनी शनिवारी स्वतंत्रपणे नामांकन दाखल केले. युवासेना-भाविसेच्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजीत प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश केला. यावेळी भाविसेचे राज्य निमंत्रक राजेंद्र जंजाळ यांच्या उपस्थितीत उमेदवारी दाखल केली. यात डॉ. तुकाराम सराफ, ॲड. विजय सुबुकडे, पूनम सलामपुरे, सचिन वाहूळकर, अनघा देशमुख आदींचा समावेश आहे. यावेळी सागर पाटील, संदीप लिंगायत, शेखर जाधव, हनुमान शिंदे, ज्योतीराम पाटील, प्रकाश सुर्वे, संकेत डोईफोडे, सागर खर्गे, निखिल चव्हाण, विशाल गायके, हेमंत दांडगे, सौरव यादव, विवेक बापटे, ऋषी मुळे आदी उपस्थित होते.

एकत्र कुटुंब पद्धतीचा होणार गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : भारतीय संस्कृतीमध्ये एकत्र कुटुंब पद्धतीला मोठे महत्त्व आहे. या संस्कृतीचा गौरव करण्यासाठी आणि आजच्या तरुण पिढीसमोर नवा आदर्श ठेवण्यासाठी सकल मारवाडी युवा मंच मिडटाऊन शाखेच्या वतीने स्वर्ण सिडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १७ नोव्हेंबर रोजी स. ११ वाजता कलाग्राम येथे या कार्यक्रमाला सुरुवात होईल.

ज्या कुटुंबात चार पिढ्या एकत्रित नांदत आहेत, अशा २१ कुटुंबांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात येणार आहे. यामध्ये धार्मिक विधी होऊन तिसरी पिढी पहिल्या पिढीचे पाद्यपूजन करील. यावेळी चारही पिढ्यांनी उपस्थित असणे अनिवार्य आहे.

सकल मारवाडी युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष संजय मंत्री, गोविंद राठी, सुप्रिया सुराणा, ममता तिवारी, पूनम सारडा, माया मुथा, जयश्री गुजरानी, सोनाली सारडा कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

धनगर समाजबांधवांचा आनंदोत्सव

औरंगाबाद : सोलापूर विद्यापीठाला अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याची घोषणा झाल्याबद्दल चिकलठाणा येथील अहिल्यादेवी होळकर चौकात धनगर समाजबांधवांनी आनंदोत्सव साजरा केला. यावेळी मदनकाका नवपुते, संजय चौधरी, सुनील नाडे, गणेश दहीहंडे, प्रभाकर बकाल उपस्थित होते.

मॅरेथॉन मंत्रा

आपल्यातील सुप्त मिल्खासिंग जागवा

संजय पाटील
डायरेक्टर, रिलॅक्स झील

- मॅरेथॉनमधील सहभागी ज्येष्ठ आणि युवांसाठी फिटनेस हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. महामॅरेथॉनकडे फिटनेसच्या दृष्टीने पाहायला हवे. मात्र, महामॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यापूर्वी आपणास काही काळजी घ्यावी लागेल. सर्वात प्रथम स्पर्धकांनी आपल्या शरीराला धावण्यासाठी तयार करावे लागेल. यासाठी योग्य आहार व धावताना सुयोग्य ठरतील असे बूट व कपडे वापरा. यानंतर एका चांगल्या मार्गदर्शकाच्या सूचनेनुसार मॅरेथॉनच्या दिवसासाठी आतापासूनच तयारीला लागा. स्पर्धेतील शारीरिक व मानसिक तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी विविध प्रकारचे व्यायाम करुन तुम्ही स्वत:ला अधिक सक्षम करु शकता. ते करण्यास प्राधान्य द्या. एक लक्षात ठेवा मॅरेथॉनमधील सहभागाने तुम्हाला नवीन मित्र, नवीन समूह भेटेल. यामुळे तुमच्यात नवे बदल होतील.
- धावण्यास सुरुवात केल्यानंतर तुम्हाला न केवळ आरोग्याबाबत फायदे दिसतील, तर यातून मिळालेल्या ऊर्जेने तुमच्या आयुष्यातसुद्धा खूप सारे आनंददायी क्षण येतील. एकदा तुम्ही यात धावलात म्हणजे तुम्ही एका नव्या वलयांकित समूहात सहभागी झालात. शेवटी एवढीच काळजी घ्या की, स्वत:स दुखापत करुन घेऊ नका. योग्य आराम करा आणि छोटे- छोटे टप्पे पार करण्यास प्राधान्य द्या. जर तुम्ही या मॅरेथॉनमध्ये अजूनही सहभागी होण्याचा विचार केला नसेल, तर उठा हीच योग्य वेळ आहे तुमच्यातील सुप्त मिल्खा सिंगला जागृत करण्याची.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

४० परिचारिकांना समजपत्र

घाटी रुग्णालय : कार्यक्रमास गैरहजर राहण्याचा फटका?

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : घाटी रुग्णालयातील तब्बल ४० परिचारिकांना समजपत्र देण्यात आल्याची माहिती समजते. कर्तव्य संपल्यानंतर मस्टरमध्ये स्वाक्षरी न करता गेल्याचा ठपका ठेवून सर्वांना समजपत्र देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे; परंतु प्रत्यक्षात सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमास गैरहजर राहिल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे बोलले जात आहे.

याविषयी मिळालेली माहिती अशी, घाटी रुग्णालयात ३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्तीचा कार्यक्रम पार पडला. अनेक वर्षे सोबत कर्तव्य बजावणाऱ्यांना सन्मानाने निरोप देण्यासाठी सर्व परिचारिकांनी उपस्थित राहण्याची सूचना करण्यात आली होती. सकाळच्या वेळेत कर्तव्य बजावणाऱ्या परिचारिकांना सकाळी आल्यावर ७.३० आणि परत जाताना दुपारी २.३० वाजता मस्टरमध्ये स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.

सेवानिवृत्तीचा कार्यक्रम दुपारनंतर होता. या कार्यक्रमास परिचारिकांनी उपस्थित राहावे, यासाठी मस्टरच लपून ठेवण्यात आले. कार्यक्रमानंतरच स्वाक्षरी करण्याची सूचना करण्यात आली होती,असे सूत्रांनी सांगितले. सकाळपासून आलेल्या ४० परिचारिका दुपारी स्वाक्षरी न करताच निघून गेल्या. हा प्रकार लक्षात आल्याने त्यांना समजपत्र देण्याची कारवाई करण्यात आली.

नियमाप्रमाणे स्वाक्षरी करावी

दुपारी जाताना परिचारिकांनी स्वाक्षरी केली पाहिजे. शासकीय नियमाप्रमाणे दिलेल्या वेळेत स्वाक्षरी केलेली नसेल, तर ४० परिचारिकांना समजपत्र दिलेले असतील,असे शासकीय परिचारिका कर्मचारी संघटनेच्या सरचिटणीस इंदुमती थोरात म्हणाल्या.

केवळ समज

परिचारिकांनी जाताना सही करुन जायला पाहिजे. पुन्हा असे करु नका,अशी त्यांना केवळ समज देण्यात आली आहे. सेवानिवृत्ती कार्यक्रमाचा काहीही संबंध नाही, असे अधिसेविका छाया चामले म्हणाल्या.

अंतरंग समुपदेशन केंद्राचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : शहरातील टीव्ही सेंटर भागातील पवननगरमध्ये अंतरंग समुपदेशन व मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन झाले. आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात आपलं मूल इतर मुलांपेक्षा सरस असले पाहिजे; मात्र पालकांना आपल्या मुलांमधील गुण, क्षमता माहीत नसतात, हीच गरज ओळखून अंतरंग समुपदेशन व मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्राचे उद्घाटन मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अनघा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्राचे संचालक डॉ. सुनील जाधव उपस्थित होते. व्यक्तिमत्त्वासह इतर गुणांचे मानसशास्त्रीय चाचण्यांच्या साहाय्याने मापन करुन समुपदेशन व मार्गदर्शन केले जाणार असल्याचे संचालकांनी सांगितले.

प्रत्यक्ष प्रयोगातून शिका वैज्ञानिक गंमती जमती

द यलो डोअर उपक्रम : १९ ते २५ नोव्हेंबरदरम्यान विज्ञान कार्यशाळा; नैसर्गिक कुतूहल अजमावून पाहण्याची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये अद्यापही पाठांतरावर अधिक जोर दिला जातो. विज्ञानासारख्या विषयाच्या बाबतीत तर हे अधिकच मारक ठरते. अशा 'पोपटपंची' दृष्टिकोनामुळे विद्यार्थ्यांना मूलभूत संकल्पनाच उमजत नाही. मुळात विज्ञान शिकताना नावीन्यता, सृजनशील विचार आणि प्रायोगिक शिक्षण पद्धती गरजेची असते.

हीच बाब लक्षात घेऊन 'द यलो डोअर'तर्फे 'प्रथम'च्या साह्याने १९ ते २५ नोव्हेंबरदरम्यान लोकमत भवन येथे एक भन्नाट 'वैज्ञानिक कार्यशाळा' आयोजित करण्यात आली आहे. या विज्ञान मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग करणे, विविध उपकरणे हाताळणे आणि आपले नैसर्गिक कुतूहल अजमावून पाहण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. वय वर्ष ९ ते १५ या गटातील मुलांना या कार्यशाळेत सहभागी होता येईल.

'जपानच्या मोनोरेलसारख्या अत्यंत क्लिष्ट वैज्ञानिक संकल्पनाही साधी-साधी उपकरणे आणि साहित्यांचा वापर करुन शिकविल्या जाऊ शकतात. त्यामागील अपकर्षणाचे विज्ञान समजून घेणे फारसे अवघड नाही. विद्यार्थ्यांना समजेल अशा रंजक प्रकारे शिकविले की त्यांना चटकन कळते. तेच काम या विज्ञान कार्यशाळेत केले जाणार आहे', अशी माहिती 'द यलो डोअर'च्या प्रतिनिधीने दिली.

या कार्यशाळेत निरीक्षण, प्रयोग, पॅटर्न ओळखणे, तर्क, हाताने मॉडेल तयार करणे आदी गोष्टींच्या आधारे मूलभूत वैज्ञानिक संकल्पना उलगडून दाखविण्यावर भर देण्यात येणार आहे.

कार्यशाळेच्या सात दिवसांमध्ये विद्यार्थ्यांना विविध प्रयोगांचे प्रशिक्षण देण्यात येईल. कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी (२६ नोव्हेंबर) वैज्ञानिक मेळावा (सायन्स फेअर) भरणार आहे. यामध्ये स्वत: विद्यार्थींच मेळाव्याला भेट देणाऱ्यांना विविध प्रयोग आणि वैज्ञानिक संकल्पनांविषयी माहिती देतील. यामुळे एक तर विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट होतील आणि त्याचा फायदा त्यांना पुढील उच्चशिक्षणासाठी होईल. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचाही हेतू यातून साध्य होणार आहे.

कार्यशाळेमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अशा या अनोख्या आणि भन्नाट कार्यशाळेत आपल्या पाल्याला प्रवेश देऊन आपण त्यांच्या वैचारिक प्रगतीला वाव मिळवून देऊ शकता. तर मग विचार कसला करता? आजच आपला सहभाग निश्चित करण्यासाठी दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधा.

आता 'सायन्स' होणार 'फन'

द यलो डोअर 'विज्ञान कार्यशाळा'
दिनांक : १९ ते २५ नोव्हेंबर
स्थळ : द यलो डोअर, लोकमत भवन, औरंगाबाद.
संपर्क : ९५२७७५२८००, ९८५०३७२२८००

घाटी रुग्णालय : लिक्विड ऑक्सिजन सिस्टीम बसविणार

६ कोटींचा प्रस्ताव तयार

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : घाटी रुग्णालयातील सर्जिकल इमारतीमध्ये लिक्विड ऑक्सिजन सिस्टीम बसविण्यासाठी प्रशासनाने ६ कोटींचा प्रस्ताव तयार केला आहे. प्रस्ताव डिसेंबरअखेरीस घाटी प्रशासनातर्फे पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांनी दिली.

'घाटी रुग्णालय ऑक्सिजन सिलिंडरवर' या मथळ्याखाली 'लोकमत'ने १४ ऑगस्ट रोजी वृत्त प्रकाशित करुन घाटीतील परिस्थिती समोर आणली. घाटी रुग्णालयात अत्याधुनिक ऑक्सिजन यंत्रणा (सेंट्रल ऑक्सिजन) बसविण्यात आली आहे; परंतु ही यंत्रणा अवघ्या काही वॉर्डांपुरती मर्यादित आहे. अनेक वॉर्डांत रुग्णास ऑक्सिजनची आवश्यकता भासल्यावर धावपळ करुन ऑक्सिजन सिलिंडर लावला जातो.

घाटीत प्रत्येक महिन्याला ऑक्सिजनवर ६ लाखांचा खर्च होतो. लहान मोठे सिलिंडर आणि लिक्विड ऑक्सिजनच्या माध्यमातून ३० वॉर्डांत ऑक्सिजनचा पुरवठा करण्यात येतो. सिलिंडर उचलून नेणे, त्याच्यावर लक्ष ठेवणे आणि संपल्यावर बदलण्यासाठी मोठा ताण सहन करावा लागतो. सर्जिकल इमारतीमध्ये लिक्विड ऑक्सिजन सिस्टीम बसविण्यासाठी दिल्ली येथील एका पथकाने नुकतीच घाटीत पाहणी केली. घाटीच्या प्रांगणातच लिक्विड ऑक्सिजन प्रकल्प उभारण्यात येणार असल्याने सिलिंडरसाठी येणारा खर्च आटोक्यात येण्यास मदत होणार आहे. प्रकल्पासाठी जागेची निवड सुरु असल्याचे बधिरीकरण शास्त्राचे विभागप्रमुख डॉ. सुहास जेवळीकर यांनी सांगितले.

घाटीतील मेडिसीन विभागात सेंट्रल ऑक्सिजन सिस्टीम आहे. येथे एका टँकमधून अतिदक्षता व आयसीसीयू, 'एमआयसीयू'ला ऑक्सिजन पुरवठा केला जातो. सर्जिकल इमारतीमधील ऑपरेशन थिएटरमध्ये ऑक्सिजन पुरवठा करण्यासाठी एक टँक आहे. या दोन्ही टँकमध्ये लिक्विड ऑक्सिजनचा पुरवठा केला जातो. तेथून पाईपद्वारे रुग्णांना ऑक्सिजन पुरविला जातो. इतर ठिकाणी मात्र जम्बो सिलिंडर लावून पाईपद्वारे ऑक्सिजन दिला जाते.

सिलिंडरची मागणी

सिलिंडर	संख्या
लहान सिलिंडर	३०० ते ४००
जम्बो सिलिंडर	१५०० ते १६००